"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। ज्ञानेन हीना: पशुभि समान: ।।

मूल्य रु. ५

| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ | वर्ष : ४३ | एप्रिल - २०२१ |

**BOOK PACKET**

Regd. with Registrar of News papers of India Reg. No. RN 37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# निमंत्रण

## ठाणे मंच रौप्यमहोत्सवी वर्ष

ठाणे मंचच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा सांगता व समारोप सोहळा याचे निमंत्रण देण्यास आम्हांला आनंद होत आहे.

**तारीख :** रविवार ६ जून २०२१

**वेळ :** १०.०० ते ५.३०

**कार्यस्थळ :** प्राचार्य बी. एन. वैद्य सभागृह, राजा शिवाजी विद्यालय, दादर पूर्व

आपल्या बँकेचे अध्यक्ष श्री. किशोर कुलकर्णी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविणार असून प्रथितयश उद्योजक श्री. सतीश वाघ हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित असतील

याप्रसंगी ठाणे मंचाने संपादित केलेल्या 'पाव शतकाची वाटचाल' या स्मरणिकेचे प्रकाशन श्री. कुलकर्णी यांच्या हस्ते होईल. तसेच या समारंभात काही उल्लेखनीय व्यक्तींचाही सत्कार करण्यात येईल.

यानंतर विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर करण्यांत येतील. आपण आपल्या आप्तेष्टांसह या कार्यक्रमात सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.

ठाणे/मुलुंड मार्गे १ आणि जोगेश्वरी, अंधेरी, पारले मार्गे १ बस ठीक ९.०० वाजता सोडण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. इच्छुकांनी आपली नांवे त्वरीत खालील व्यक्तींस कळवावी.

सुरेश पालेकर : ८९२८८५०१९३

अरुण वाघ : ९८२०३७७१०२

कार्याध्यक्ष : मारुती दळवी

कार्योपाध्यक्ष : सुरेश पालेकर

कार्यवाह : अरुण वाघ

खजिनदार : गिरीश रेगे

दुर्गादास रेगे, राजेश दिवेकर, ज्योती सुखटणकर, आनंद वागळे

# संपादकीय

## करोनाचा फटका

गेले वर्षभर करोनामुळे जगभर जनजीवन विस्कळीत झाले आहे. सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांतून, व्हॉटसअॅपवरुन, प्रशासनाच्या प्रसिद्धी खात्यातर्फे या संदर्भात सतत ऊहापोह होत असतो. म्हणून परत येथे त्यावर चर्चा करायची गरज नाही. करोनामुळे आपल्या संघाच्या व एज्युकेशन सोसायटीच्या कार्यातही व्यत्यय येत आहे. सुरुवातीचे काही महिने कार्यालय बंदच ठेवावे लागले. नंतर काही वेळ दिवसाआड व आता दररोज कार्यालय उघडे आहे पण कार्यकारिणीच्या सभा होऊ शकल्या नाहीत तरी २८ जानेवारी रोजी उभय संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा भरविण्यात आल्या.

संघाच्या नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार एप्रिल २०२० च्या पहिल्या आठवड्यात सुमारे साठ कुटुंबीयांना त्रैमासीक आर्थिक साहाय्य देण्याची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. पण एक सक्रीय स्वयंसेवक श्री. गिरीश रेगे यांनी नाशिकमध्ये राहूनसुद्धा आपल्या बँकेशी ईमेलद्वारे योग्य ती यंत्रणा राबवून सर्व लाभार्थींना साहाय्य पोचविण्याची व्यवस्था केली. आता सर्व लाभार्थींना वेळच्या वेळी त्रैमासिक साहाय्य मिळत आहे.

देशभरात करोनाशी अहोरात्र सामना करणारे आरोग्य सेवा निगडीत व्यावसायिक, पोलीस, बस कंडक्टर्स यांच्या सामाजिक योगदानाचे कौतुक होत असते व ते योग्यच आहे. आपल्या ज्ञाती संदर्भात एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवीदास नाडकर्णी यांचे योगदान एवढे आहे की, त्यांचे जाहीर कौतुक करणे जरुरीचे आहे. मुखपत्रिकेच्या एप्रिलच्या अंकात गरजू विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यांत येतात पण एप्रिल २०२० चा अंक प्रसिद्धच झाला नसल्यामुळे त्यांनी गतवर्षीच्या नोंदणीनुसार सर्वांशी संपर्क साधून त्यांना अर्थसाहाय्य देण्याची व्यवस्था केली. आपले वार्षिक ज्ञाती संमेलन नोव्हेंबरच्या शेवटच्या रविवारी होते. त्यावेळी इतर कार्यक्रमा व्यतिरिक्त ज्ञातींतील हुशार विद्यार्थ्यांना कौतुक व प्रोत्साहन म्हणून रोख बक्षिसे सर्वांच्या उपस्थितीत जाहीरपणे दिली जातात व त्या संबंधीची सूचना जुलैच्या अंकात प्रसिद्ध करण्यात येते. पण लॉकडाऊनमुळे तो अंक प्रसिद्ध झाला नाही व स्नेहसंमेलनही भरले नाही. म्हणून गेल्या अंकात योग्य ती सूचना देऊन बक्षिसपात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले. त्या सर्व अर्जांची छाननी करणे, शिष्यवृत्तीच्या दात्यांच्या अटी म्हणजे वर्ग, विषय या संबंधाची वर्गवारी करुन बक्षिसांची रोख रक्कम ठरविणे, प्रमाणपत्रे करणे, धनादेश तयार करणे हे अत्यंत वेळ काढू व किचकटीचे कार्य श्री. नाडकर्णी यांनी संघाच्या कार्यालयात वेळोवेळी जाऊन पूर्ण केले. आता ही बक्षिसे विद्यार्थ्यांना घरपोच मिळतील.

लॉकडाऊनमुळे गेल्या वर्षी वार्षिक स्नेहसंमेलनाशिवाय मुंबई मंचाचा खाद्य मेळावा, ठाणे मंचाची सहल , महिलांचा तिळगुळ समारंभ रहितच झाले. आगामी वर्षात संघाचे कार्यक्रम पूर्ववत होतील अशी आशा करुया.

देव बरे करुं

द.ना.नाडकर्णी

# एज्युकेशन सोसायटी - शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०२१ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जुलै २०२१ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा. ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए.कॉस्टिंग, एन्.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिस इ)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परिदेशातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी** : गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करून शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

# प्रकाशझोत

## 'स्वराज्य' सोशल वेलफेर ऑर्गनायझेनशनतर्फे 'मैत्री चॅरिटेबल ट्रस्टला' उत्कृष्ठ सामाजिक संस्था पुरस्कार

डॉ. मालिनी व श्री. जगदीश नाडकर्णी यांनी डोंबिवली येथे स्थापन केलेली 'मैत्री चॅरिटेबल ट्रस्ट' ही सेवाभावी संस्था वृद्धांच्या सेवेत कार्यरत आहे. या संस्थेला 'स्वराज्य' या सोशन वेलफेर ऑर्गनायझेनतर्फे त्यांच्या ७ व्या वर्धापनदिनी 'उत्कृष्ट सामाजिक संस्था पुरस्कार २०२०' याने सन्मानित करण्यात आले. 'मैत्री चॅरिटेबल ट्रस्ट' या संस्थेची विशेष माहिती पुष्ठ १८ वर दिली आहे.

## श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर यांचा 'शब्दवेल' हा आणखी एक ललित लेख संग्रह प्रकाशित

गेल्या पिढीतील कारवार येथील प्रतिष्ठित व्यक्ती राव बहाद्दूर गणपतराव तेलंग यांची म्हापसा येथे स्थायिक झालेली, श्रीमती मीरा प्रभूवेर्लेकर ही नात. मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात त्यांच्या 'विचार वलये' या लेखसंग्रहाचा उल्लेख केला होता. तेव्हा त्यांची गोमंतकातील उदयोन्मूख लेखिका म्हणून ओळख करुन दिली होती. अलीकडेच त्यांचा 'शब्दवेल' हा आणखी एक ललितलेख संग्रह प्रकाशित झाला. त्यांच्या संग्रहाना मंगेश पाडगावकर, रवीन्द्र पिंगे सारख्या प्रथितयश साहित्यिकांची प्रस्तावना मिळविण्याचा त्यांचा प्रघात आहे. 'शब्दवेल' या पुस्तकालाही पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांची हृद्य प्रस्तावना मिळाली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे 'मीरा प्रभूवेर्लेकर यांच्या लेखन कौशल्याने खरोखर स्तिमित झालो. भवतालचे सूक्ष्म निरीक्षण, त्यावर स्वत:च्या मनाचे एकाग्र चिंतन, आणि शेवटी त्यांचे लालित्यपूर्ण शब्दरुप. साहित्याचा एक छोटा पण किंमती दागिना घडविण्याची अजोड कुसर श्रीमती प्रभूवेर्लेकर यांच्यापाशी उपजतच आहे असे या पुस्तकातील काही लेख नमुन्यादाखल वाचले तरी ध्यानात येते. ही कुसर जपत एक आशयसंपन्न ललितलेख लिहिण्यापूर्वी त्यासाठी संपन्न आशयाचे सोने लागते ते टिपण्यामागे अभिजात अशी सौंदर्य दृष्टी लागते. तेव्हांच रसिकांच्या पसंतीस उतरणारा साहित्यालंकार निर्माण होतो.'

('शब्दवेल' मूल्य रु. १८५ मीरा प्रभूवेर्लेकर , म्हापसा ९४२०२४२३९६)

## आपल्या बॅंकेला इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी या वर्गवारीत 'बेस्ट कॉपरेटीव्ह बॅंक" हा पुरस्कार व बॅंकेचे अधिकारी श्री. विशाल राठोड यांना बेस्ट आय्. टी. हेड हा बहुमान

'बॅन्किंग फ्रंटीयर्स' हे बॅंकींग क्षेत्राशी निगडीत असलेले एक दर्जेदार मासिक आहे. त्यांच्यातर्फे २३ जानेवारी २०२१ रोजी FCBA 2020 (Frontiers in Co-operative

banking) पुरस्कारांचे वितरण झाले. त्या सोहळ्यात इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी या वर्गात आपल्या बँकेला बेस्ट कोऑपरेटीव्ह बँक हा पुरस्कार मिळाला. तसेच बँकेचे आय. टी विभागप्रमुख श्री. विशाल राठोड यांना बेस्ट आयटी हेड हा पुरस्कार मिळाला.

**कु. पंकजा पिंगे सी. ए. च्या अंतिम परीक्षेत पहिल्याच प्रयत्नांत उत्तीर्ण – पिंगे कुटुंबीयांची हॅटट्रीक**

पारले येथे राहणारे आपल्या बँकेचे माजी उपाध्यक्ष श्री. नागेश दिनकर पिंगे हे एक निष्णात सी. ए. समजले जातात. २०१५ साली The Institute of Chartered Accountants यांच्यातर्फे त्यांना 'बेस्ट सीए अवॉर्ड' हा मानाचा पुरस्कार मिळाला होता. त्यांची मोठी कन्या कु. निकीता ही सुद्धा सी. ए. असून सिंगापूर येथे जॉन्सन अँड जॉन्सन या बहुराष्ट्रीय कंपनीत उच्च पदावर आहे. श्री. पिंगे यांची धाकटी कन्या कु. पंकजा ही सुद्धा यंदा सी एच्या अंतिम परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाली व कुटुंबामध्ये सी.ए होण्याची हॅटट्रीक साधली. पंकजा पूर्वी बी. कॉम परीक्षा उत्तीर्ण व्हायच्या अगोदरच सी.ए.च्या इंटरमीडियेट परीक्षेत ४४ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली होती.

**स्पृहणीय यश**

**जोगेश्वरी येथे रहाणारे सौ. हेमांगिनी व श्री. दत्तकुमार प्रभाकर कुलकर्णी यांची कन्या**

**कु. तेजश्री** ही अलीकडेच एस्. एन्. डी. टी. विद्यापीठाच्या एल. एल.बी च्या परीक्षेत ८३.३० एवढे गुण मिळवून 'ओ ग्रेड' मध्ये उत्तीर्ण झाली. एल. एल.बी. परीक्षेत सर्वात जास्त गुण मिळाल्याबद्दल व कायदा विभागात सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनी म्हणून तिला दोन सुपर्णपदके मिळाली आहेत.

**विरार येथे आयुर्वेदाचे हॉस्पिटल चालविणारे श्री. दत्तात्रय बाळकृष्ण मुझमदार यांचा मुलगा कुमार मंदार**

याला अलीकडेच आयुर्वेदामधील एम्. डी. ही पदवी मिळाली. त्याने काया चिकित्सा विषयांत विशेष प्रावीण्य मिळविले आहे. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सतर्फे घेतलेल्या या परीक्षेत त्याला महाराष्ट्रांत प्रथम क्रमांक मिळाला.

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| क्षितीज रामानंद दिवेकर, वाशी | व | पूजा अनंत भट, कोथरुड |
| रीमा केदार पालेकर, ठाणे | व | श्रवण लक्ष्मीकांत शेट्टी, पवई |
| गिरीश योगेन्द्र (परेश) पिकळे, बोरीवली | व | करिष्मा रमेश सोंडकर, बोरीवली |
| श्रुती दिनेश वागळे, अंधेरी | व | सागर त्रिंबक सोमण, नेरुळ |

# प्रत्यक्ष अनुभवलेले चटकदार चटके

**A)** दर दोन ते तीन वर्षांनी, आमची युरोप–अमेरिकेला तिन्ही मुलींना भेटण्यासाठी, दीड महिन्याची सफर असते.

आमची मोठी मुलगी लीना युरोपमधील ऑस्ट्रिया देशांतील इन्सब्रुक शहरी रहाते. इन्सब्रुकमध्ये खास टुरीस्टसाठी 'डे' पासाची सवलत आहे. हा पास तिकडच्या ट्रॅमवर तसेच बसवर सबंध दिवस कुठेही चालतो. दिवसभर शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत भ्रमण, वेगवेगळ्या रेस्टॉरंटमध्ये भोजन, अशा कार्यक्रमांमुळे सबंध इन्सब्रुक आम्ही अनेकदा पालथे घातले आहे. फक्त शनिवारी आणि रविवारी लीनाबरोबर तिच्या गाडीतून इतर प्रेक्षणीय स्थळे बघायला जात असोत.

अशाच एका शनिवारी लीना आम्हाला इन्सब्रुकच्या प्रसिद्ध आकन्से लेक वर घेऊन गेली. लेकजवळच्या मैदानावर काही मुली व्हॉलीबॉल खेळत होत्या. लीनाला बघितल्याबरोबर १५–२० मुली धावत आमच्याकडे आल्या. त्यांना पाहताच माझे पाय लटपटायला लागले. काय करावे हेच सुचेना. प्रत्येक मुलगी Topless होती. म्हणजे अगदी त्याच अवस्थेत त्या व्हॉलीबॉल खेळत होत्या. मला म्हणाल्या – अंकल, आज आमचा टॉपलेसने खेळण्याचा दिवस आहे. – तुमची हरकत नाहीना? मी काय बोलणार ! चोरुन बायकोकडे पाहिले आणि उद्गारलो – 'अजिबात नाही ! उलट फारच सुखद् अनुभव आहे."

अनेक महिने आम्ही विचार करीत होतो –

१. आमची M.A., Ph.D, Top Ranker अत्यंत हुशार, गुणी, आज्ञाधारक, लीनापण याच अवस्थेत व्हॉलीबॉल खेळते ?

२. व्हॉलीबॉल टॉपलेस अवस्थेत खेळण्याचा हा एकच प्रकार आहे का ? आणखी इतर दिवशी काही वेगळे प्रकार असावेत व असल्यास ते काय आहेत ?

३. व्हॉलीबॉलशिवाय इतर खेळसुद्धा या मुली कशा खेळत असाव्यात ?

४. एक विचारसुद्धा हळूच चोरुन मनांत आला आणि तो म्हणजे आम्हांलाही खेळांत सामील करुन घेतील का ? आणि कुठल्या अवस्थेत ?

५. आजुबाजूला सर्व टॉपलेस मुली बघून आम्हालाच सर्व अंग झाकल्याने चोरासारखे वाटत होते.

**B)** ही १९५२–५३ मध्ये घडलेली हकिकत आहे. आम्ही पाच भाऊ आम्हाला बहीण नाही. पण माझी सर्वांत आवडती आतेबहीण –सिंधू गंडभीर – नुकतेच लग्न होऊन – सौ. सिंधू मारुती तेलंग आपल्या पतीसमवेत मधुचंद्र साजरा करण्यास कारवारला आली होती.

नेमक्या दुसऱ्याच दिवशी, भल्या पहाटे मारुती भावोजी मला समुद्रकिनाऱ्यावर

फिरायला घेऊन गेले. त्यांना तेथे एक छोटीशी होडी पाण्याजवळ किनाऱ्यावर आढळली. त्यांत दोन 'व्हली' पण होत्या. समुद्रही अगदी शांत होता. मारुती भावोजींच्या आग्रहामुळे कोणी जवळपास नाही असे, पाहून आम्ही ती होडी पाण्यांत ढकलली आणि जरा आत नेली. आम्हा दोघांनाही, स्वत:च होडी व्हलवण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. दोघांनाही अजिबात पोहता येत नव्हते. शिवाय होडी स्थिर राखण्यास आवश्यक असलेले होडीला लावलेले 'व्हलांडही' नव्हते. जवळजवळ तासभर आम्ही होडी, व्हली आणि पाण्याशीच झगडत होतो. होडी केवळ स्वत:भवतीच फिरत होती. तसेच भरतीची सुरुवात झाल्याने होडी निश्चित १०-१२ फुट खोलीच्या पाण्यांत होती. अचानक एक कोळी - बहुतेक त्या होडीचा मालक असावा - किनाऱ्यावर हातवारे करुन ओरडत होता. बहुतेक तो आम्हाला शिव्या देत असावा. एका साथीबरोबर पोहत, दोघेही होडीजवळ आले आणि त्यांनी ती होडी कशीबशी किनाऱ्यावर आणली. मारुती भावोजींनी त्यांना कांही पैसे देऊ केले पण ते न घेता दोघेही कानडी भाषेत, बावटेकट्ट्याजवळ बोट दाखवून जोरजोरांत बोंबलत होते. एकंदर गंभीर मामला, बावटेकट्टयाकडे पाहताच आमच्या लक्षांत आला. जबरदस्त वादळाच्या इशाऱ्याचा काळा बावटा तेथे लावला होता आणि वादळास सुरुवातही झाली होती. केवळ शांताईच्या कृपेनेच आम्ही सुखरुप किनाऱ्यावर आलो होतो.

घरच्यांना सर्वप्रकार कळल्यावर सर्वांनी मलाच जबाबदार धरले आणि मारुती भावोजींच्या देखतच माझी चांगलीच शाब्दिक धुलाई झाली.

'अरे तुमका किते जाल्यार आमकाभी थय येवन जीव दिवचो पडता आशिल्लो. आमका त्या देवतेनच वाचयले !' इति आजोबा आजी.

**C)** हिंदू हायस्कूलच्या १९५४ च्या एस. एस.सी. बॅचचा मी विद्यार्थी होतो. एस.एस.सी परीक्षेचा शेवटचा पेपर दुपारी १ वाजता संपल्यावर मी आणि माझा परममित्र - दासा पै - सहज फिरत फिरत समुद्रकिनाऱ्यावर आलो. कैक महिन्यांचा शीण अचानक नाहीसा झाल्याने मन आणि शरीर अगदीच अस्वस्थ झाले होते. अचानक एवढी शांतता आणि स्तब्धता सहन होत नव्हती. बराच वेळ, गुडघाभर पाण्यांत आम्ही शांत उभे होतो. अचानक दोघांच्याही मनांत - आपसांत एक शब्दही न बोलता - पाण्यांत डुबकी घ्यायचा विचार आला आणि उत्स्फूर्त टाळी वाजवून आम्ही किनाऱ्याकडे धावलो.

सबंध किनाऱ्यावर एक चिटपाखरुही नव्हते. कोणी नाही असे पाहून आम्ही दोघांनी सर्व कपडे काढले आणि तसेच पाण्यांत नागवेच शिरलो. सर्व कपडे काढणे अत्यंत जरुरीचे होते कारण ओली चड्डीसुद्धा घरी नेणे शक्य नव्हते - सहज पकडले गेले असतो - आणि या खेपेला माझी धुलाई केवळ शाब्दिकच राहिली नसती.

ओहोटी संपून भरतीस सुरुवात झाली होती. आम्ही आमच्याच तंद्रीत होतो. अचानक पायाखालची वाळू लागेनाशी झाली. आम्हाला दोघांनाही पोहता येत नव्हते. आमच्या धडपडीत समुद्राच्या पाण्याचे दोन–तीन घोटही पोटांत गेले. मला वाटते, शांताईच्या कृपेने, अचानक एक लाट आली आणि आम्ही किनाऱ्याच्या दिशेने फेकले गेलो. पायाला वाळू लागताच, कसेबसे आम्ही किनाऱ्यावर आलो आणि कपडे घालून काहीच झाले नाही असे मनाला समजावीत घरी गेलो.

आज या गोष्टीला ६०+ वर्षे होऊन गेली. तरीसुद्धा त्या घटनेचा बारीकसारीक तपशीलसुद्धा चांगलाच आठवतो – नव्हे डोळ्यांसमोर येतो. आपसूकच शांताईला हात जोडले जातात!

**D)** दि इंडियन आयर्न अँड स्टील कं. लि. मध्ये १५ वर्षे नोकरी करण्यात माझा एक जबरदस्त फायदा झाला, आणि तो म्हणजे माझा आत्मविश्वास प्रचंड बळावला. याला कारण गुजराथी, मारवाडी, सिंधी आणि इतर व्यापार करणारी मंडळी! त्यांच्याशी माझा सतत संपर्क असायचा. अगदी क्वचितच एखादे महाराष्ट्रीयन/मद्रासी गिऱ्हाईक भेटायचे.

एक २० वर्षाच्या कोवळ्या गुजराथी तरुणाने, केवळ माझ्या सांगण्यावरुनच, मी ऑफर केलेला रु. २० लाखाचा माल घेतला. माझ्या देखत, माझ्याच टेबलावरील फोनवरुन, त्याने स्वतःच्या ऑफिसमधून वडिलांकडून IISCO नावें वीस लाख रुपयांचा चेक मागविला. कुठल्याही प्रकारे त्याने घेतलेल्या मालाची माहिती दिली नाही आणि अर्ध्या तासांत तो चेक माझ्या ऑफिसमध्ये पोचला सुद्धा. त्यावेळचे रुपये वीस लाख म्हणजे आताचे कमीतकमी रुपये दीड कोटी तरी असावेत. बापाचा आपल्या वीस वर्ष वयाच्या मुलावर इतका प्रचंड विश्वास बघून मी खरोखरच थक्क झालो.

त्या मुलाचे नाव – प्राणलाल वडालीया. त्या दिवसापासून आमची दोस्ती झाली.

कॉलेजमध्ये असताना माझा आवडीचा विषय होता – गणित! आणि कुठल्याही प्रकारच्या 'प्रोजेक्ट रिपोर्ट' बनविण्यांत माझा हातखंडा होता. अगदी लहानसहान गोष्टींतसुद्धा मी एक छोटीशी यादी बनवीत असे – (Line of action). समजा मला सबंध दिवसांत कंपनीच्या कामानिमित्त मुंबई निवासी, दहा लोकांना भेटायचे असेल तर प्रथम मी त्या दहाजणांची यादी बनवित असे. नंतर मी त्यांना भेटण्याचा मार्ग निश्चित करत असे. नंतर कामानुसार त्यांना भेटण्याची वेळही निश्चित करीत असे. असे कधीच झाले नाही की माझी पहिली अपोईंटमेंट बोरीवलीला, दुसरी वांद्रयाला आणि तिसरी परत बोरीवलीजवळ गोरेगांवला! अशी माझी ही वेळ आणि मार्गानुसार त्या दहा अपोइंटमेंटस्ची यादी तयार झाली की मी प्रत्येक नावासमोर अगदी संक्षिप्त रूपात त्यांच्याशी काय बोलायचे आहे वगैरे कामाची नोंद करीत असे व या

प्रकारामुळे / सवईमुळे माझा कधीच वेळ वाया गेला नाही किंवा कुठलीही भेट/विषय अपूर्ण राहिला नाही. अर्ध्या पोस्टकार्ड साईजच्या कागदावर सर्व मजकुर लिहून तो शर्टाच्या वरच्या खिशांत ठेवल्यावर मी कामाला तयार!

जेव्हा मी IISCO सोडून पनवेलला स्वत:ची केमिकल फॅक्टरी काढण्याचा विचार केला तेव्हा अतिशय काळजीपूर्वक मी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला होता. केवळ स्वत:च्या रु. ५०,०००च्या भांडवलावर आणि बँकेच्या सहकार्यावर एक भव्य फॅक्टरी उभी रहाणार होती. सर्व खाचखळग्यांचा पूर्ण विचार केला होता. पण खरोखर सांगतो – कितीही शिकलो, अनुभव घेतला तरी आपल्या गौडसारस्वत ब्राह्मणाचा आत्मविश्वास त्याला पुरेशी साथ देत नाही. मी सुद्धा संपूर्ण तयारी असताना सुद्धा संभाव्य, काल्पनिक संकटांचाच विचार करीत होतो व शेवटी पूर्ण प्रोजेक्टवरच पाणी सोडण्यापर्यंत पाळी आली.

अशावेळी माझा परममित्र प्राणलाल समोर आला आणि म्हणाला –'साहेब तुम्ही सुरुवात करा! मला खात्री आहे की तुम्ही निश्चितच यशस्वी व्हाल आणि तुम्हाला जर पैशाची गरज लागली तर रु १० लाखापर्यंत मी व्यवस्था करु शकतो आणि हे माझे तुम्हाला वचन आहे'. केवळ प्राणलालच्या भरवश्यावर शांताईचे नाव घेऊन आम्ही कामाला सुरुवात केली आणि यशस्वी झालो. अगदी माझ्या प्रोजेक्ट रिपोर्टप्रमाणे फॅक्टरी तयार झाली होती आणि **प्राणलालकडून एक पैसाही मला घ्यावा लागला नव्हता.**

डोकेदुखीकरिता आपण क्रोसिन घेतलेच असेल. क्रोसिन हे केवळ 'ट्रेडनेम' आहे. क्रोसिन म्हणजेच पॅरासिटामॉल – जे आम्ही बनवित होतो. जवळजवळ पांच वर्षे क्रोसिनच्या पाकिटांत केवळ आमचाच माल होता. फक्त बाहेरचे कव्हर क्रोसिनचे! (Loan Licensing Arrangement).

थोडक्यात GSB हुशार, कल्पक तसेच मेहनती आहेत. या GSB ना केवळ थोड्याशा आत्मविश्वासाचीच गरज आहे आणि माझी खात्री आहे आपला GSB केवळ या आत्मविश्वासाच्या बळावरच कुठलेही शिखर सहज गाठू शकेल. शांताई नेहमीच त्याच्या पाठीशी असेल.

**E)** हा १९८३–८४ सालचा प्रसंग आहे. अतुल बारावी सायन्सच्या परीक्षेची तयारी करीत होता. फिजीक्स, केमिस्ट्री तसेच गणित अशा तीन विषयांकरिता – ट्यूशन घेण्याचा हट्ट धरुन बसला. मला नवल वाटले. तीनही विषयांत नेहमीच ८५% पेक्षा जास्ती मार्कस् मिळविणाऱ्या मुलाला ट्यूशनची काय आवश्यकता होती? तरीपण अतुलच्या मते, ट्यूशन घेतल्याने, योग्यतेशिवाय २–३% मार्कस् निश्चितच जास्त मिळतील याची त्याला खात्री होती. तेव्हा केवळ नाईलाजाने मला अतुलला परवानगी द्यावी लागली. त्यावेळी ह्या ट्यूशनकरीता प्रत्येक

विषयासाठी जवळजवळ रु. १०,०००/– खर्च होता. सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅमला रु. १८००/– होता व आता तो रु. ४७,०००/– च्या आसपास आहे. यावरुन अशा ट्यूशन्स त्यावेळीसुद्धा किती महागड्या होत्या याची कल्पना येईल.

ह्या ट्यूशन्समुळे म्हणा, अतुलला तिन्ही विषयांत ९८% मार्क्स मिळाले आणि मुंबईच्या UDCT मध्ये केमिकल इंजिनिअरींग करिता पहिल्याच फटक्यांत अॅडमिशन मिळाली.

गणिताकरिता त्याने श्री. कात्रेसरांना निवडले होते व कात्रेंनी त्याला फारच उत्तम प्रकारे सबंध गणिताचा कोर्स शिकविला. कात्रेसर आमच्या घरीच शिकवणीला येत असत. मला त्यांची शिकविण्याची पद्धतही आवडली होती.

त्या १९८३–८४ साली सहज माझ्या मनांत काही विचार आले होते ते मी आपल्यासमोर मांडीत आहे –

मी कात्रेसरांना विचारले – केवळ बारावीच्या परीक्षेच्या दृष्टीनेच संपूर्ण गणित कोर्स शिकविण्यांत त्यांना किती तास लागतील? त्यांनी थोडा विचार करुन उत्तर दिले की, सर्वसाधारण विद्यार्थ्याला नजरेसमोर धरून, जास्तीत जास्त ४० तास त्यांची उपस्थिती लागेल.

मी माझ्या मनांतली एक कल्पना कात्रेसरांसमोर मांडली. समजा त्यांची ही सर्व लेक्चर्स जर आपण professionally व्हीडीओ रिकॉर्ड करुन घेतली. तसेच खास परीक्षेच्या दृष्टीने, त्यांनी बनविलेल्या नोटस्च्या कॉपिज काढून घेतल्या तर जास्तीत जास्त ४० कॅसेटस् होतील. (त्यावेळी कॅसेटस् आता सिडीज, चिप्स वगैरे). तसेच प्रत्येकी जवळजवळ एकूण २०० पानाच्या नोटस् तयार होतील. या सर्व ४० कॅसेटस् तसेच २०० पानी नोटस्च्या कायदेशीर मालकी हक्काबद्दल मी त्यांना रु. ५०,०००/– ऑफर केले व ते तयार झाले. फिजीक्स, केमिस्ट्री करिताही मी अशीच व्यवस्था करणार होतो.

माझा प्लान असा होता की चर्चगेट ते विरारमधील प्रत्येक स्टेशन पासून, पायी जास्तीत जास्त १० मिनिटाच्या अंतरावर, २०० ते २५० चौ. फुटाची एखादी जागा भाड्याने घ्यायची व तेथे टि.व्ही. तसेच कॅसेट–प्लेअर आणि २५ ते ३० विद्यार्थ्यांना बसण्यासाठी, प्रत्येक खुर्चीला जोडून असलेल्या लहान टेबलाची व्यवस्था करायची. कॅसेटस् तसेच नोटस्च्या कॉपिज ठेवण्यासाठी एक मजबुत कपाट व तिथल्याच ५० चौ. फुट जागेत आणखीन एक टि.व्ही. व कॅसेट प्लेअरची व्यवस्था.

याचा अर्थ असा होता की, कात्रेसर एकाच दिवशी वेगवेगळ्या वीस–पंचवीस ठिकाणी, प्रत्येकी २५ ते ३० विद्यार्थ्यांना ट्यूशन देत आहेत! तेही न थकता, पूर्ण जोशाने आणि अत्यंत काळजीपूर्वक! शिवाय प्रत्येक विद्यार्थ्यांकडे त्यांच्या २०० पानाच्या नोटस्ही आहेत.

एखादा विद्यार्थी, काही कारणांमुळे जर क्लासमध्ये हजर राहू शकला नाही किंवा

लेक्चरचा एखादा भाग त्याला नीट समजला नाही, तर काही छोटी फी भरुन, त्या दिवसाची कॅसेट, त्याच क्लासमध्ये असलेल्या छोट्या रुममध्ये एकांतात पाहू शकेल.

या संपूर्ण गणिताच्या कोर्ससाठी प्रत्येक विद्यार्थ्याला रु. २०००/– फी मी ठरविली होती. फिजीक्स तसेच केमिस्ट्री विषयांसाठीही प्रत्येकी रु. २०००/– आणि तीनही विषय एकत्र घेतल्यास एकूण रु. ५०००/– फी ठरविता आली असती. गरीब/मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना याचा जबरदस्त फायदा घेता आला असता. आपल्या ज्ञातीतील योग्य विद्यार्थ्यांना, जर आवश्यकताच वाटली, तर विनाशुल्क ॲडमिशन देण्याचाही माझा विचार होता.

परंतु ज्या तीन ट्यूशन्सना एकूण रु ३०,००० खर्च आला असता तो पूर्णपणे केवळ रु. ५,००० तच साध्य झाला असता.

हा माझ्या कल्पनेपेक्षाही फारच मोठा प्रकल्प ठरला होता आणि माझी स्वत:ची प्रत्यक्ष हजेरी अगदीच आवश्यक होती. पण माझ्या केमिकल फॅक्टरीमुळे मला ते अजिबात शक्यच नव्हते आणि हा सर्व प्रोजेक्ट केवळ कागदावरच राहीला.

मला अजूनही वाटते की या ३७ वर्षापूर्वीच्या, कागदावरच राहिलेल्या प्रकल्पामुळे, स्वार्थ आणि परमार्थ अगदी भरपूर आणि जबरदस्त साधता आला असता!

**अरुण भास्कर कसबेकर**

**९८२०२९१३६५/८७७९९८६६०६**

## वृद्धाश्रम – एक आनंदाश्रम!

आजकाल ज्येष्ठ नागरिकांना स्वत:च्या मुलांबरोबर रहाणे दिवसेंदिवस कठीणच होत चालले आहे व त्याची अनेक कारणे आहेत.

खास करुन आपल्या GSB समाजात उच्च शिक्षण, चांगला जॉब वगैरे कारणांनी आपली मुले परदेशात स्थलांतर करतात. भरपूर पैसे कमवतात. आपल्या आईवडिलांना भेटायला दरवर्षी जरी जमत नसले तरी दोन तीन वर्षांतून एकदा तरी, काही आठवड्यांकरिता येतात. आईवडिलांना भरपूर पैसे पाठवायची त्यांची तयारी असते. पण अचानक आजारपण उद्‌भवले तर आईवडिलांसाठी धावाधाव करायला जवळ कोणीही नसते. केवळ पैशांच्या जोरावर एकटेपणाचे आणि आरोग्याचे प्रश्न आईवडिलांनाच सोडवावे लागतात.

आईवडिलांना स्वत: बरोबर परदेशांत घेऊन जाण्याचीही कांही मुलांची तयारी असते. पण सगळे आयुष्य भारतात घालविलेल्या आईवडिलांना परदेशांत करमणे जरा कठीणच. शिवाय कामाचा बोजाही परदेशांत, या वयस्कर लोकांना जरा जास्तीच असतो. लहान नातवंडांची काळजी घेणे, मुले ऑफीसमधून थकून येतील, त्या 'बिचाऱ्यांकरिता' जेवण तयार करणे. इतरवेळी घराच्या स्वच्छतेकडे लक्ष देणे. धुवायचे कपडे वॉशींग मशीनमध्ये टाकणे,

जमल्यास कपड्यांना इस्त्री सुद्धा करणे वगैरे वगैरे.

भारतातही एक किंवा दोन बेडरुम फ्लॅटमध्ये मुलांबरोबर रहाणे सुद्धा त्रासदायकच ठरु शकते. नातवंडे मोठी झालेली असतात. वयात आलेल्या नातवंडांना साहजिकच वेगळ्या खोलीची, तसेच एकांताची गरज भासते. आजोबा–आजींची अडचण वाटू लागते. अकारण 'धुसफुसचे' वातावरण वाढू शकते.

अशा या भावनात्मक प्रश्नांच्या भडिमारापासून सुटण्याचा फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे 'वृद्धाश्रम"

माझे अगदी स्पष्ट मत आहे की, आजच्या पिढीला आपल्या चांगल्या भवितव्यासाठी खूपच संघर्ष करावा लागतो. माझ्या पिढीला एवढा सामना करावा लागला नव्हता. शिवाय युवा पिढीला त्यांचे वेगळेच विश्व आणि अनेक जबाबदाऱ्या असतात. तेव्हा वृद्धाश्रमच ज्येष्ठ नागरीकांना एक खरोखरच मस्त संधी आहे – स्वत:चे उर्वरित आयुष्य अगदी मनसोक्त जगण्याची ! आणि युवा पिढीच्या प्रेमपूर्वक आदरास पात्र होण्याची !

मात्र वृद्धाश्रम असे पाहिजे की जेथे रहाणे म्हणजे आयुष्याशी, तसेच मुलांशी केलेली तडजोड नव्हे तर, ते जीवनभर परिश्रम केल्याचे परितोषिक ठरले गेले पाहिजे.

आपल्या कारवारजवळ सदाशिवगडावर कवळे मठाच्या मालकीची एक प्रशस्त जागा आहे. पण त्या जागेचा बराचसा भाग बाजूच्या रहिवाश्यांनी बळकाविलेला आहे आणि माझी अशी विनंती आहे की आता शिल्लक उरलेला प्लॉट ज्ञातीबंधूंच्या कल्याणाकरिता या वृद्धाश्रमाकरिता वापरला जावा किंवा किमान तीन एकराचा वेगळा प्लॉट घेणे आवश्यक आहे.

माझ्या मते सदाशिवगड हे ठिकाण GSB समाजातील ज्येष्ठ नागरीकांना अत्यंत सोयीस्कर पडेल. कारण –

**१) योग्य परिसर :** एका बाजूला काही मिनिटांच्या अंतरावरच कारवार तर दुसऱ्या बाजूला गोवा. शिवाय गोवा–कारवारमानाने सदाशिवगडावर जागा निश्चितच जरा स्वस्तच आणि वातावरणही शांत तसेच प्रदुषणरहीत !

**२) एकांतवासाचा अंत :** वाढत्या वयोमानाबरोबर, एकटेपणा सहन होत नाही व सारखी चिडचिड होते. तसेच अस्वस्थता येते. पण इथे आपल्याच समवयस्क बांधवांचा सदोदीत गराडा.

**३) आहार :** रोज आपल्या आवडीचे कारवारी पद्धतीचे चमचमीत सुग्रास जेवण तेही अगदी कारवारचे ताजे ताजे मासे वापरुन केलेले कधी नीरफणसाच्या फोडी आणि किल्ल्याची (वासोटे) भाजी तर कधी सुक्या बांगडे/मोरीची किसमूर ! केवळ दहीभात आणि ही किसमूर मला फाईव्हस्टार जेवणापेक्षाही अगदी मनापासून आवडते !

**४) आजारावर मात :** ज्येष्ठ नागरिकांच्या सामान्य आजारावर वृद्धाश्रमाला जोडून असलेल्या मेडिकल क्लिनीकमध्ये अगदी ताबडतोब उपचार किंवा कठीण उपचारांसाठी कारवार, गोव्याला जाण्यासाठी अँबुलन्सची तडकाफडकी सोय! अशा तातडीच्या सुविधा मिळणे, मुलाबाळांसह राहून सुद्धा कठीणच! तसेच ज्येष्ठ नागरिकांना नियमित लागणारी औषधे तसेच व्हिटामीन्सचा भरपूर साठा सुद्धा या क्लिनीकमध्ये असेल. तो सुद्धा MRP पेक्षा २५% कमी भावाने!

**५) काही कठोर नियम :** हे धर्मादाय वृद्धाश्रम किंवा हॉस्पिटल नव्हे! तेव्हा केवळ मानसिक तसेच शारिरीक दृष्ट्या तंदुरुस्त असलेल्या ज्येष्ठ नागरीकांचीच या वृद्धाश्रमांत रहाण्याची सोय होऊ शकेल. परंतू काही कारणास्तव अगदीच परावलंबी झालेल्यांना सांभाळणे वृद्धाश्रमाच्या आवाक्याबाहेर जाईल. त्याचा इतर सभासदांना दिलेल्या सेवेवर परिणाम होईल. तेव्हा अशा वृद्धांना त्यांच्या आप्तेष्टांनी परत नेणे आवश्यक ठरेल. एकदा वृद्धाश्रमाबरोबर कायद्याप्रमाणे बँकगॅरंटीसह इतर करार झाल्यावर सभासदांचे आप्तेष्ट कुठल्याही प्रकारे याबाबतीत टाळाटाळ करु शकणार नाहीत. कारण त्यांचा हलगर्जीपणा कोर्टाच्या दृष्टीने कायदेशीर गुन्हा ठरेल. याबाबतीत वृद्धाश्रमाने नेरळच्या Dignity of old home च्या कायदेकानुनचा अभ्यास करणे तसेच पालन करणे आवश्यक ठरेल.

**६) आवश्यक सेवा :** आठवड्यातून एकदा डॉक्टरांकडून सर्वांचे B.P. तसेच Bloodsugar तपासण्याची मोफत सोय. फिजीओथेरपिस्टची तसेच मानसोपचारतज्ज्ञाची महिन्यातून एकदा आश्रमांत व्हिजीट.

**७) क्लब हाऊस :** तेथे पत्ते कुटण्याची सोय, बुद्धीबळ, कॅरम तसेच इतर बैठे खेळांची व्यवस्था, प्रत्येक खोलीत टि.व्ही. असणारच पण क्लब हाऊसमध्ये एक मोठा टि.व्ही., एक टेबल टेनिस, तसेच एखाद्या कोपऱ्यात छोटा Gym. एक स्पिनींग सायकल आणि एकाच जागी चालण्याच्या, धावण्याच्या व्यायामाकरिता एक 'ट्रेडमिल'. आश्रमाच्या आवारातच वॉकर्स ट्रॅक.

**८) योगारुम :** केवळ ज्येष्ठ नागरिकांसाठी योग्य अशी योगासने, प्राणायम शिकविण्याची आणि करण्याची सोय.

**९) करमणुक :** एखादा वेगळा हॉल किंवा सोयीस्कररीत्या डिझाईन केलेल्या Club House मध्ये स्वास्थ्य तसेच इतर ज्ञानवर्धक विषयांत पारंगत असलेल्या विद्वानांच्या व्याख्यानांची सोय. तसेच इतर करमणूकीचे कार्यक्रम. आपले ज्येष्ठ सभासद आपल्या जवानीतले रंगतदार किस्से तसेच रोमांचक अनुभवाचे कथन करु शकतील.

**१०) आराधना मंदिर :** श्री गणेश / श्री शांतादुर्गा / श्री मंगेश / श्री महालक्ष्मी / श्री हनुमान

यांच्या मूर्ती असलेले एक लहान मंदीर जेथे 'अभिषेक नैवेद्य' व इतर छोट्या पुजेंची सोय व ध्यानधारणेसाठी (Meditation) ५-६ आसने.

**११) छोटे वाचनालय :** ठराविक वृत्तपत्रांची, मासिके, नियतकालिकांची व्यवस्था.

**१२) इतर सेवा :** शास्त्रोक्त मालीश, स्टीमबाथ वगैरेंची वाजवी दरांत उपलब्धता. वृद्धाश्रमाच्या मालकीची एक बेड ॲम्बुलन्स, तसेच बारा सीटस्‌ची एक छोटी बस चोवीस तास वृद्धाश्रमाच्या आवारात हजर असेल.

**१३) गेस्ट हाऊस :** वृद्धाश्रमाच्या सभासदांस भेटण्यास येणाऱ्या आप्तेष्टांसाठी सुद्‌धा, आधुनिकरीत्या सजविलेल्या तीन-चार खोल्या वृद्धाश्रमाच्या आवारांतच बांधलेल्या असतील.

**१४) अनुदान :** कर्नाटक शासनाकडून जास्तीत जास्त अनुदान मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न! याबाबतीत दादर (पूर्व) ला असलेल्या Health Rakshak (a GSB Clinic Care at its best) यांचा सल्ला घेणे अतिआवश्यक आणि फायदेशीर ठरेल.

**१५) प्रशासन :** याबाबतीत सर्व उत्तमोत्तम वृद्धाश्रमांचे साहाय्य घेणे अत्यंत जरुरीचे आणि उचित ठरेल. शिवाय संपूर्ण वृद्धाश्रमांचे कायदेकानून, Account Books, चॅरिटी कमिशनर व इतर शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन होणे सुद्धा अतिआवश्यक आहे. यासाठी अगदी योग्य सेवानुभावी अशा कर्मचाऱ्यांची आणि संस्थांची नेमणुक करणे फार महत्वाचे आहे. एक सत्य लक्षात ठेवा - आश्रमांत जे ज्येष्ठ ज्ञातिबांधव राहतील त्यांतील प्रत्येक व्यक्ती तिच्या आयुष्यांतील जे कांही ३०-४० वर्षांचे कार्यक्षेत्र होते, त्यांतील अनुभवांचे प्रचंड भांडार असतील. कोणी इंजिनियर/डॉक्टर/ सी.ए./वकील/ आर्किटेक्ट / केमिस्ट/ हॉटेल-रेस्टॉरन्टचे मालक किंवा इतर कुठल्याही पेशांतले दर्दी, आपल्या अनुभवाचा फायदा आश्रमास देण्यास, मोठ्या आनंदाने पुढे सरसावतील. मी तर म्हणेल की, आश्रमाच्या प्रत्येक विभागावर Honorary Chief या सभासदांपैकीच, त्यांच्या अनुभव क्षेत्रानुसार नेमलेले असावेत.

इथे मला एक 'शेर' सुनवावासा वाटतो -

जो जाके कभी न आये
उसे जवानी कहते है।
और जो आके कभी न जाये
वह बुढापा।।

हे एक त्रिकाल सत्य आहे. पण हाच बुढापा आपण आपल्या खास प्रयत्न आणि कौशल्याने सर्वांसाठी आनंददायी, मंगलमय तसेच उत्तम स्वास्थ्यमय करु शकतो.

थोडक्यात उरलेल्या आयुष्यांत जीवनाचा परिपूर्ण आनंद कसा घ्यावा या विषयी मौलीक मार्गदर्शन, प्रात्यक्षीक, उदाहरणे, अनुभव तसेच आचरण, आपल्या ज्येष्ठ बांधवांना

एका विलक्षण समाधानी, आणि तृप्त अशा पातळीवर घेऊन जाईल.

मला खात्री आहे अशाप्रकारचे वृद्धाश्रम, आपल्या ज्येष्ठ बांधवांना एक वरदानच ठरेल आणि ते सुद्धा इतके की भारतात किंवा परदेशी आपल्या मुलांना भेटायला गेल्यावर काही दिवसांतच वृद्धाश्रमवासींना आपल्या वृद्धाश्रमांत परतण्याचे वेध लागतील. वयाची पन्नाशी ओलांडलेले आपले बांधव कधी एकदा साठी गाठतो आणि वृद्धाश्रमात दाखल होण्यास पात्र ठरतो याची उत्कंठतेने वाट बघतील. आपल्या माहितीकरिता सांगतो की, आपल्या गोव्याच्या स्नेहमंदीर वृद्धाश्रमात लांबलचक वेटींगलिस्ट आहे.

**वृद्धाश्रमाची आखणी, उभारणी वगैरे :** माझ्या मते ही फारच सोपी गोष्ट आहे. आपल्याला फक्त Follow the experts / copy the best – हीच पॉलिसी आत्मसात करावी लागेल. ज्येष्ठ नागरिकांच्या शारिरीक, मानसिक दौर्बल्यावर मात करणाऱ्या शक्य तेवढया सोयींची तजवीज करावी लागेल. पुण्यांत श्री. परांजपे बिल्डर्सनी खास ज्येष्ठ नागरिकांकरिता बांधलेल्या कॉलनीची रचना, खोलीतील तसेच टॉयलेटस्मधील खास फिटींगस्, तसेच पुण्यातील, गोव्यातील व इतर काही प्रसिद्ध वृद्धाश्रमांची बारकाईने तपासणी, नेरळमधील सुप्रसिद्ध Dignity Home for Old – त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी दिलेल्या अप्रतिम सोयींचा अभ्यास व पहाणी करणे आवश्यक असेल. थोडक्यात, इतरांनी केलेले परिश्रम, अनुभव आणि रिसर्चचा आपण पुरेपूर फायदा घेणे आवश्यक आहे. बहुतेक माहिती Google वर सुद्धा मिळेल.

आपल्या ज्ञातीचे प्रसिद्ध आर्किटेक्ट कै. श्री. प्रकाश शेटगिरी माझे घनिष्ठ मित्र होते आणि शांताई व आपले पूज्य स्वामीजींचे परमभक्त होते. त्यांचे चिरंजीव श्री. अमोल – वडिलांचा वारसा अप्रतिमपणे चालवित आहेत. मला खात्री आहे, अमोल याबाबतीत मोठ्या खुशीने आपल्याला मार्गदर्शन करु शकतील किंवा इतर कोणीही आर्किटेक्ट ज्यांना वृद्धाश्रम डिझाईनमध्ये अनुभव आहे, त्यांची मदत घेता येईल. ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक, शारिरीक, दौर्बल्यावर मात करणारी वास्तु त्यांच्या सुरक्षा तसेच सुखसोयींच्या व्यवस्थेची अद्ययावत यंत्रणा असलेली वास्तू निर्माण करण्यात आपल्या परमपूज्य स्वामीजींनी / N.K.G.S.B. संघाने पुढाकार घेतल्यास सगळा GSB समाज त्यांचा चिरंतन ऋणी राहील. मी सहज श्री. अमोल यांच्याकडे या प्रकल्पाबद्दल वाच्यता केली आणि त्याने सहर्ष स्वतःतर्फे सर्वतोपरी साहाय्य करण्याचे वचन दिले.

आपल्या गरजू ज्येष्ठ ज्ञातिबांधवांना ही सेवा अगदी वाजवी दरात मिळेल. पण त्यामुळे आपल्या मठावर / संघावर कुठल्याही प्रकारे आर्थिक भार येणार नाही. मला पूर्ण खात्री आणि विश्वास आहे की, आपल्या सधन बांधवांकडून या कार्यपूर्तीकरिता मदतीचा ओघ लागेल.

आपल्या ज्ञातीचे एक बांधव – दानवीर श्री. सतीश वाघ यांनी दि. २० डिसेंबर २०१९ ला आपल्या जोगेश्वरीच्या सरस्वती बागेच्या शतकपूर्ती सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणांत अगदी स्पष्ट खुलासा केला होता की, आपल्या ज्ञातिबांधवांच्या सोयीकरिता ठरविलेल्या कुठल्याही कार्यपूर्तीसाठी रुपये पाच कोटींपर्यंत साहाय्य करण्याची त्यांची अगदी मनोमन इच्छा आहे. त्यांच्या अशा सढळ सहकार्याने आपला मठ / संघ, वृद्धाश्रमाचे कार्य सुलभरीत्या तडीस नेऊ शकतील.

माझी स्वत:ची सुद्धा, खारीचा वाटा असे समजून, या प्रकल्पाला काही सोप्या अटीवर, रुपये पंचवीस लाख देण्याची तयारी आहे.

मुलांनी स्वत:च्या आईवडिलांना अशा वृद्धाश्रमांत स्वखर्चाने पाठविणे हे हीन कृत्य नसून एक महान पुण्यकर्म आहे असे सर्वांना पटले पाहिजे व आईवडिलांना अशा मुलांचा अभिमान वाटला पाहिजे.

हे वद्धाश्रम फक्त भारतातीलच नव्हे तर जगातील एक आदर्श असे वृद्धाश्रम – एक आनंदाश्रम म्हणून गणले गेले पाहिजे, जेथे ज्येष्ठ नागरिकांच्या, केवळ शरिरीकच नव्हे तर खास करुन मानसिक समस्यांचे काळजीपूर्वक निराकरण केले जाईल.

तसेच जीवनातील अंतिम अटळ सत्याला तृप्त, समाधानी आणि हसतमुखाने सामोरे जाण्याचा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झालेला असेल.

**अरुण भास्कर कसबेकर**

**९८२०२९१३६५/८७७९९८६६०६**

नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार

**'नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. वृत्तविलास' त्रैमासिकाचे प्रकटन**

Form IV Rule 8

**१.प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४.

**२. प्रकाशन अवधी :** त्रैमासिक

**३. मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी, **राष्ट्रीयत्व : भारतीय**

**पत्ता :** दि नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४.

**४. मालक :** दि. नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४.

मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०२१** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** – प्रकाशक

## ‘एक हात ‘मैत्रीचा, आपुलकीचा’
## डॉ. मालिनी व श्री. जगदीश नाडकर्णी यांचे डोंबिवली येथील
## मैत्री चॅरिटेबल ट्रस्ट

माहीम येथे राहणारे श्री. जगदीश भास्कर नाडकर्णी व त्यांच्या पत्नी डॉ. मालिनी यांनी सुमारे १५ वर्षापूर्वी डोंबिवली येथे ‘मैत्री चॅरिटेबल ट्रस्ट’ ही सेवाभावी संस्था स्थापन केली. वार्धक्यामुळे अंथरुणाला खिळलेल्या, स्मृतिभ्रंशाने ग्रासलेल्या आजी आजोबांना इथे हरतऱ्हेची वैद्यकीय उपकरणे, सोयीसुविधा व उपचार, शुश्रुषा अत्यंत जिव्हाळ्याने उपलब्ध करुन दिली जातात. अंतिम श्वासापर्यंत त्यांचा आपुलकीने सांभाळ केला जातो. परसिरांतील सर्वसामान्य जनांसाठी एक धर्मादाय दवाखानाही चालविला जातो. त्याअंतर्गत विविध तपासण्या व उपचार अत्यल्प दरांत व मोफत पुरविले जातात. निराधारांचा सांभाळ केला जातो. सध्या हे सर्व काम भाडेतत्वावरील जागेत चालते आता त्यांना ३७०० स्क्वेअर फीटची जागा पाहिजे व त्याचा खर्च अंदाजे दोन कोटी आहे. या कामात भरघोस अर्थसाहाय्य करुन वा अन्यप्रकारे सेवाभावी वृत्तीचे बांधव सहकार्य करु शकतात.

**वृद्धसेवाकेंद्राच्या कार्याचे स्वरुप :** वृद्धांची आपुलकीने सेवाशुश्रुषा, वैद्यकीय सोयीसुविधा व उपचार, अंथरुणाला खिळलेल्या व स्मृतिभ्रंशाने ग्रासलेल्यांचा अंतिम श्वासापर्यंत सांभाळ.

**धर्मादाय दवाखाना :** तज्ज्ञ डॉक्टरांकरवी उपचार, अत्यल्प दरांत विविध तपासण्या, मोफत आरोग्य शिबिरे.

**डे केअर सेंटर व अन्य सेवा :** गरीब व गरजू मुली व स्त्रियांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक ती मदत, निराधारांचा सांभाळ, बेवारस मृतदेहांवर रीतीरिवाजाप्रमाणे अंत्यसंस्कार.

**पत्ता :** मैत्री चॅरिटेबल ट्रस्ट, गणेशकृपा सोसायटी,
आजदेपाडा, डोंबिवली जिमखाना रोड, डोंबिवली (पू),
ठाणे – ४२१ २०१
जगदीश नाडकर्णी : ९८२०११०३७१
डॉ. मालिनी नाडकर्णी : ९८२०२८१३२९

**बँक खाते :** Maitri Charitable Trust
NKGSB Co-op Bank Ltd.
S/B A/c. : 013100100012957
IFSC Code : NKGS0000013
Donations are exempted under 80 G of Income Tax
Cheque to be drawn in favor of Maitri Charitable Trust

# "पु. ल., चांदणे स्मरणाचे" - परिचय

'महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्व' म्हणून 'पु. लं.' बद्दल जितकी आत्मीयता वाटते, तितकाच किंवा तिच्याहून काकणभर जास्तच आपलेपणा वाटतो, कारण ते आपल्या 'कारवारचा नातू' आहेत!

लेखन, वक्तृत्व, अभिनय, दिग्दर्शन, संगीत दिग्दर्शन, दिलखुलास मनोवृत्ती, मनाची विशालता, विनोदाची पखरण करण्याची अद्‍भुत शैली, अशा नाना कळा अंगी असणाऱ्या 'पु. लं.'च्या सर्वच गुणांवर मराठी माणूस लुब्ध झाला आहे! त्यांच्या व्यक्तित्वाला 'अष्टपैलू' हे विशेषणही खरं तर अपुरंच आहे! ते पूर्ण करण्यासाठी आणखी अनेक पैलूंच्या संख्येची भर घालणं, केवळ अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ, त्यांची लोकसंग्रह करण्याची हातोटी, गुणग्राहकता, बाणेदारपणा वगैरे वगैरे.

अशा लोकोत्तर व्यक्तीचं चरित्र लिहिणं, हे खरोखरच अत्यंत अवघड काम! पण एखादा विशाल जलाशय दोन्ही हातांच्या ओंजळीत उचलून धरण्याइतकं हे कठीण आव्हान "मंगला गोडबोले" या सिद्धहस्त लेखिकेने स्वीकारुन अत्यंत यशस्वी रीत्या अक्षरशः शिवधनुष्याप्रमाणे पेललं आहे!

"पु.ल. चांदणे स्मरणाचे" हे त्यांचं सर्वांगसुंदर पुस्तक हातात आलं, आणि ते अखेरपर्यंत अधाशागत वाचतच रहावसं वाटलं!

पु. लं.च्या बालपणापासून संपूर्ण जीवनप्रवासातील नानाविध प्रसंगांच्या हृद्य आठवणींची 'अलिबाबांची गुहा' च जणू लेखिकेने वाचकांसमोर उघडली आहे. त्यातील बऱ्याचशा आधी परिचित होत्या. त्यांना उजाळा मिळाला तर कांही नव्याने कळल्या आणि पु.लं.बद्दलचा आदरभाव अधिकच वृद्धिंगत झाला.

बालपणापासूनच वाचनाची विलक्षण तहान असलेले, नि 'तांबे, गडकरी' वगैरेंना दैवतंच मानणारे पु.ल. थोरांची भाषणं ऐकण्यातही रंगून जात, पण अशा प्रसंगीही त्यांची अंगभूत खट्याळ विनोदी वृत्ती कशी उचल घ्यायची त्याची रंजक उदाहरणं लेखिकेने 'सुभाषबाबू, तात्यासाहेब केळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर' यांच्या भाषण-प्रसंगामधून दिली आहेत.

वक्तृत्वाइतकीच संगीत-साधना, पेटीवादन 'पु.लं'च्या आवडीचं! स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात कवी कुसुमाग्रजांच्या 'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल'ने आपल्या 'जाणिवांना वाचा फुटली' या शब्दात व्यक्त होणाऱ्या 'पु.लं.' बरोबरच 'कवि अनिल, राजा बढे, बाकीबाब बोरकर' वगैरेंच्या कवितांना गोड चाली लावणाऱ्या 'पु.लं'ना मंगलाताईंनी आपल्यासमोर अक्षरशः साकार केलं आहे!

'पु.लं'चं कॉलेजजीवन, त्यातील त्यांनी रंगविलेले कार्यक्रम याचं खुमासदार वर्णन वाचण्याची संधी पुस्तकात मिळतेच.

'चिंतामणराव कोल्हटकरांचे' संस्कार, अन् 'नाट्यनिकेतन'शी जुळलेलं नातं यामुळे नाट्य व संगीत या दोन्ही क्षेत्रात त्यांना पाय कसे रोवता आले, आणि चित्रपटाच्या रुपेरी जगतात देखील ते कसे चमकले, हे सांगताना 'पु.ल. नि सुनीताबाई' यांच्या भूमिका असलेला 'वंदेमातरम्' हा चित्रपट, 'सबकुछ पु.ल.' असलेला 'गुळाचा गणपती' या चित्रपटांचा परामर्शही वाचनीय आहे! नंतरचं सोनेरी पर्व आहे, एकपात्री 'बटाट्याच्या चाळी' पासून थेट 'वाऱ्यावरच्या वराती'पर्यंत, आणि 'तुझे आहे तुजपाशी, अंमलदार' वगैरेंपासून 'ती फुलराणी' सारख्या सर्वांगसुंदर नाटकापर्यंत! 'अपूर्वाई' 'पूर्वरंग' वगैरे प्रवासवर्णनांचं रसग्रहणही अत्यंत मनोरंजक! 'बहुभाषाकोविद' 'पु.ल.' किती नाना भाषांमध्ये बोलत, भाषण देऊ शकत, लिहू शकत, हे वाचून आपण चकितझालो नाही, तरच नवल! आकाशवाणी, दूरदर्शनशी जुळलेलं त्यांचें नातं, तेथील भरघोस कार्यही, प्रभावित करुन जातं!

खऱ्या अर्थाने 'पु.लं'ची सहचारिणी शोभणाऱ्या सुनीताबाईबरोबरचा भावमधुर सहवास, पति-पत्नींनी परस्परांवर केलेले विनोद तर विलक्षण खुसखुशीत! 'पु.लं.'च्या सर्वंकष व्यवहाराचा 'भाग' आणि 'भार' सांभाळणाऱ्या, किंवा केलेलं दान सत्पात्री होत आहे ना, हे डोळ्यात तेल घालून पाहणाऱ्या 'कार्येषु मंत्री' असलेल्या सुनीताबाईंच्या कौतुकास्पद कार्याचं मंगलाताईंनी केलेलं वर्णनही काळजाला भिडतं!

या सर्वातील काळसाधिष्ठित भाग म्हणजे 'वसंत सबनीस' यांना मुलाखत देताना 'पु.लं'नी केले ल्या 'वारा, बसवला' यासारख्या शब्दांवरच्या श्लेष अलंकारात्मक कोट्या! हे केवळ उदाहरणादाखल, अन्य प्रसंगीही 'पु.लं'नी केलेल्या 'अनंत कोट्या' उद्धृत करुन लेखिकेने या 'स्मरणयात्रे'ला 'चांदण्यांची' किनारच लावली आहे! एका वाक्यात सांगायचं, तर मंगलाताईंचं हे पुस्तक वाचताना प्रत्यक्ष 'पु.लं'ना भेटल्याचाच आनंद लाभतो!

**नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, माहीम**
**९१६७७४५६२८**

SHREE HOMOEOPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,

Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

West End
*Luxury Living*

Coming Home is always **HEAVENLY**

While in Karwar, Be at **HOME**

Be at **WEST END**



Luxury rooms with large living space between rooms, super soft mattress, friendly staff, complimentary breakfast, open green lush lawn, serene and quiet surrounding, yet in the city center.

**TRULY A HOME AWAY FROM HOME**

Pool / Gym / Activity Centre / Coffee Shop / Roof Top Restaurant / Ample car parking.

Just 2 minutes to Karwar beach

West End
*Luxury Living*

Dr. Pikle Road, Karwar

Tel: 08382- 227712 / Prakash: +91 89750 28094

hello@hotelwestendkarwar.com www.hotelwestendkarwar.com

In Mumbai contact: Mr. Rohit Kamat (99306 94555)

# डॉ. रामचंद्र (किशोर) आनंद नाडकर्णी

(२७ ऑक्टोबर १९३८ – ७ एप्रिल २०२०)

डॉ. रामचंद्र (किशोर) आनंद नाडकर्णी, माझा मोठा भाऊ, याचे ७ एप्रिल २०२० ला न्यु जर्सीच्या त्यांच्या राहात्या घरी आकस्मिकरीत्या निधन झाले. आम्हा सर्वांचा अजूनही या गोष्टीवर विश्वास बसत नाही की माझा 'दादा' , ज्याने दोन दिवस अगोदर करोना –१९ च्या रोगाबद्दल आमच्याशी चर्चा केली होती व काळजी घ्या म्हणून बजावले होते तो स्वत:च पटकन उठून 'अनंताच्या' यात्रेला निघून गेला.

या माझ्या दादाबद्दल आपल्या सर्वांना थोडिशी माहिती सांगितल्याशिवाय माझ्या मनाला शांती मिळणार नाही. त्याचा जन्म कारवारला बाड जवळ 'नंदनगद्दा' गावी श्री. आनंद नाडकर्णी व सौ. रमाबाई यांच्या पोटी झाला. वडिलांची सेंट्रल एकसाइजमध्ये फिरतीची नोकरी असल्यामुळे शालेय शिक्षण वेगवेगळ्या गावी झाले. रत्नागिरीच्या पटवर्धन हायस्कूलमधून उत्तम रीत्या गुण मिळवून तो एस.एस.सी झाला.

त्याच्या पुढील शिक्षणासाठी वडिलांनी मुंबईला बदली करुन घेतली. रुईया कॉलेजमधून १९६१ मध्ये M.S.C - Inorganic Chemistry ची डिग्री मिळवली त्यानंतर कुलाब्याच्या प्रथितयश Institute of Science मधून Director Dr. B.C. Haldar यांच्या संशोधनाखाली त्याने Analytical Chemistry त P.H.D. मिळवली. पुढे तिथेच २ वर्षे Post Doctoral Research fellow म्हणून अनुभव घेतला. त्यानंतर १९६७ मध्ये त्याला Cornell University त Post Doctoral fellowship मिळाली.

आजकाल Software Technology मुळे अमेरिका, इंग्लंड या देशांत जाणे फार सोपे झाले आहे. परंतु, ५० वर्षापूर्वी स्कॉलरशीप मिळवून या देशांत जाणे हे खरोखरच फार कठीण काम होते. दादाला तर Cornell University च्या fellowship बरोबर भारतातून मानाची समजली जाणारी Full Bright Scholarship ही मिळाली होती ज्यातून त्याला अमेरिकेला जायचा विमानप्रवासाचा खर्चही मिळाला होता.

संशोधनाची अत्यंत आवड असल्यामुळे, रिसर्च लॅबमध्ये काम करुन त्याने आतापर्यंत शंभर पेपर्स अमेरिकेच्या अनेक Chemical Journals मध्ये प्रसिद्ध केले आहेत. ASTM (American Society for Testing and Materials) या संस्थेने आतापर्यंत त्याची आठ पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्याला या त्याच्या कर्तृत्वाबद्दल ASTM तर्फे अनेक बक्षिसे मिळाली होती. त्यांत सर्वोत्तम असे Award of Merit & Charles Dudley Award for the Best Publication याचा समावेश आहे. शेवटची ३० वर्षे तो Exxon Oil Company या जगप्रसिध्द MNC मध्ये Quality Control Manager या उच्च पदावर कार्यरत होता. या काळात त्याला Exxon Oil कंपनीच्या सर्व जगभराच्या Oil Plants मध्ये तपासासाठी जावे लागायचे यामुळे त्याने जगातले सर्व देश पालथे घातले होते.

या सर्व गोष्टी आज परत परत आठवतात. कारण मुंबईला दर २–३ वर्षानी त्याची भेट

असे व त्यावेळी तो मुलुंडला आमच्याच घरी राही. परंतू त्यावेळी आम्हा भावंडाशी वागतांना त्याचे बोलणे इतके साधे असे की बाहेर हा एवढे महत्वाचे काम करतो याची आम्हाला जराही जाणीव होत नसे. मी त्याच्याहून ७ वर्षांनी लहान आहे. परंतू आम्हां दोघांचे ममत्व इतके अजब होते की जणू काही एकाच नाळेतून आम्ही जन्म घेतला होता.

५५ वर्षे तिथे राहूनही त्याला कोकणी म्हणी तितक्याच तोंडपाठ होत्या जेवढ्या तुम्हां आम्हांला आहेत. माझी वहिनी 'Nancy' अमेरिकन असल्यामुळे घरांतली बोली–भाषा इंग्लिश होती. परंतू आपल्या मुलींना आपल्या पूर्वायुष्याबद्दल माहिती असावी म्हणून त्याने २००९ साली त्याचे 'नंदनगद्याचे घर' आजोबा, काळी नदी, सदाशिवगड महामाया देऊळ या सर्वांबद्दल 'Sleeping Under The Coconut Trees' हे पुस्तक लिहीले व आम्हां सर्वांना त्याची प्रत दिली होती. ते पुस्तक वाचल्यावर ८० वर्षामागे कारवार गांव कसा होता याचे पूर्ण चित्र नजरेसमोर येते.

भारतीय इतिहासाचे त्याला सखोल ज्ञान होते. आपल्या तिन्ही मुलींना 'रामायण' 'महाभारत' यांतल्या गोष्टी तो लहान असतांना सतत सांगायचा. आयुष्यभर 'उत्तम शिक्षणाची सांगता' हेच त्यांने ध्येय ठेवले होते. वयाच्या ८२ व्या वर्षी कुणालाही काडीचाही त्रास न देता तो अनंतात विलीन झाला ते पाहून एवढेच म्हणावेसे वाटते की,

'झाले बहू, होतील बहू,
परंतु यासम हा'

**सौ. वृन्दा अरविन्द दिवेकर , मुलुंड**
**२५६१६५२७**

## एज्युकेशन सोसायटीच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक : सोसायटीच्या सभासदांना सूचना

एज्युकेशन सोसायटीची कार्यकारिणी, निवडून आलेले एक अध्यक्ष, आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा अकरा सभासदांची असते. सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०२१ रोजी संपते आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०२१–२०२४ या तीन वर्षासाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयातून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसह अर्ज पूर्ण करुन शुक्रवार दिनांक ३० एप्रिल २०२१ संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

# कल्पक अदिती

कोणताही व्यवसाय जेव्हा यशस्वी ठरतो तेव्हा त्याच्या मुळाशी तो व्यवसाय करण्याची कल्पकता असते. ही कल्पकता किंवा योजकता जितकी प्रभावी, तितका तो व्यवसाय सफळसंपूर्ण, न पेक्षा प्रत्येक व्यावसायिक हा यशस्वीच झाला असता. अर्थात या कल्पकतेपाठोपाठ भरपूर मेहनत आणि त्याचबरोबर स्वभावाची गोडी हे गुण आवश्यक आहेतच. या सर्व गोष्टी सिद्ध करुन देणारी एक व्यक्ती आपल्यात वावरते आहे. तिचीच ओळख मी करुन देणार आहे ती म्हणजे अदिती सौरभ मुझुमदार.

अदिती ही पूर्वाश्रमीची सुजाता व महारुद्र (सुनील) ब्रह्मे यांची कन्या. लग्नानंतर शामल आणि प्रवीण मुझुमदारांची सून. कारवारकरांसाठी अधिक ओळख सांगायची म्हणजे दिवेकरमास्तरांची पणतसून. माहेरी तसेच सासरीही अगदी लाडाकोडाची झाली. तिचे शालेय शिक्षण कानोसा व सेंटजोसेफ कॉनव्हेंट आणि पुढील शिक्षण साठे कॉलेज व सरदार पटेल इंजिनियरिंग कॉलेजमध्ये झाले. त्यानंतर वेलिंगकर इंस्टीट्यूट मधून तिने MBA ची पदवी मिळवली आणि एका फर्ममध्ये नोकरी धरली.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेऊनही घरातील धार्मिक व आदर्श रीतीभातींचे संस्कार तिच्यावर झाले. घरात कोंकणी भाषा असली तरी मराठी पुस्तकांचे वाचन, भक्तिगीते व भावगीतांचे श्रवण, कवितेची आवड हे सर्व तिच्याठायी उपजतच होते. नोकरी निमित्ताने मालाड ते ऐरोलीपर्यंत प्रवास करण्याच्या काळात तिला खूप विषय सुचत गेले, तसतसे त्यांना वेळोवेळी तिने काव्यस्वरुप दिले, इतकेच नव्हे तर पुढील आयुष्यात याच छंदात तिने आगळावेगळा व्यवसाय सुरु केला.

आपल्याकडे घरात छोटे–मोठे समारंभ घडतात. वाढदिवस किंवा मंगलकार्य उभे राहिले कि आपल्याला त्या उत्सवमूर्तीविषयी काहीकाव्यपंक्ती लिहाव्याश्या वाटतात किंवा एखादा लेख लिहावासा वाटतो. तसेच कुणाला लग्नात उखाणा घ्यायचा असेल तर! पण तो सुचायला तर हवा ना? हा प्रश्न अदितीने आपल्या कल्पक व्यवसायाच्या रूपाने सोडवला आहे. काही नावीन्यपूर्ण कल्पना सुचवून ती आपल्याला मदत करु शकते. ती अशाप्रकारे उत्सवमूर्तीची गुणवैशिष्ट्ये विचारुन तिच्या वयाला योग्य किंवा तिला आवडेल अशी समारंभाला साजेशी भेटवस्तू निवडून आपल्या Client च्या बजेटप्रमाणे व पसंतीनुसार आपल्याकडील कारागिराकडून करुन घेते. उत्सवमूर्तीचे कौतुक करणारी एवादी कविता करुन देते किंवा लिहून देते. या सर्वांचे जर व्हिडिओ रेकॉर्डिग करायचे असेल तर ते Client च्या स्वत:च्या आवाजात प्रत्यक्षात चित्रण करुन कविता किंवा गुणवर्णन वाचून घेते. सद्या कोविद–

१९ च्या काळात बरेचसे समारंभ Online करण्यात येतात. त्यामुळे हा व्हिडिओ रेकॉर्डिंगचा पर्याय खूपच उपयुक्त ठरतो. म्हणूनच या काळातही तिचा हा व्यवसाय नेटाने चालला आहे. या सर्वांचे श्रेय ती परमेश्वरालाच देते.

अशाच प्रकारे अदितीची प्रतिभा उत्तरोत्तर तिच्या या व्यवसायाबरोबर बहरत राहो, हीच सदिच्छा !


**अदिती** **मृदुला भांडारकर**

**९८१९१३५३१५** **९३२२२३६२५७**


## MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

MSIPL

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Can we help you to achieve your goal???

& your goal is....

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian Equity market has given avarage 16% return s in last 32 year s...***

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# रमेश तेलंग - एक सुंदर व्यक्तिमत्व

खरे म्हटले तर जीवन जगण्याचा कुठलाही कोर्स नसतो. स्वत:चे अनुभव आपल्या झोळीत टाकत जावे, नकारार्थी अनुभव वगळावे व आशावादी वृत्ती ठेवून पुढे जावे. पप्पाना हे गुपित समजले होते आणि वेळोवेळी हेच त्यांनी आम्हाला शिकवले. कठीण परिस्थितीत देखील कधी हार मानायची नाही हे त्यांचे ब्रीद वाक्य होते.

मुख्यत: कुठल्याही परिस्थितीत देखील त्यांनी स्वत:चा Sense of humor कधीही गमवू दिला नाही.

त्यांचा तो हसरा आणि खेळकर स्वभाव जणू त्यांचा मित्रच झाला होता.

खूप मेहनतीने व आत्मविश्वासाने त्यांनी Doctor of Philosophy (PhD) in Organic Chemistry ह्याचे उच्चतम शिक्षण घेतले होते.

तसेच शिक्षणाच्या बळावर फार्मा क्षेत्रात भरपूर योगदान केले. कार्यक्षेत्रात उच्चतम पदोन्नती देखील मिळवली. कॉलेजमध्ये असतांना ते उत्कृष्ट क्रिकेट पटु देखील होते व क्रिकेटमध्ये allrounder म्हणून चांगलेच नाव कमावले होते.

चित्रकलेची त्यांना भारी हौस होती. त्यांच्या चित्रामधून त्यांचे ते कौशल्य उमटून येत असे. ही हौस त्यांनी रिटायरमेंट नंतर परत जोपासली. चित्रे काढण्यात ते इतके मग्न होत असत की वेळेचे भान देखील राहायचे नाही. अशी तर बरीच सुंदर चित्रे काढली, पण त्यांचा masterpiece होता, त्यांच्या नातवंडाची चित्रे

माझ्या लहानपणाचा एक प्रसंग आठवला. शाळेत असतांना चित्रकलेची परीक्षा देण्याची मला इच्छा झाली. Elementary परीक्षेची वेळ निघून गेली होती म्हणून मी निराश होते. हे जेव्हा त्यांना समजले, त्यांनी मला intermediate level देण्याचे सुचवले. पहिला टप्पा न गाठता मी दुसरा टप्पा कसा गाठीन हा संकोच मनात होता. तेव्हा त्यांनी मला प्रोत्साहित केले. “Preeti, of course, you can do it” हे त्यांचे शब्द अजून आठवतात. त्यांच्या प्रोत्साहनामुळे चित्रकलेच्या परीक्षेत मी उत्तीर्ण झाले.

शास्त्रीय संगीत ते तन्मय होवून ऐकत. लहानपणी मला ती गाणी आवडत नसत. थोड्या वर्षांनी तुला ह्या संगीतातला गोडवा जाणवेल. असे म्हणून ते हसायचे. आणि तसेच झाले, मला आत्ता त्यांची ती ऐकवलेली गाणी गोड वाटतात!

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तसें बरेच पैलू होते, आणि माझ्या लाडक्या पप्पां बद्दल लिहित असताना, वेळ नक्कीच कमी पडेल पण एक पैलू वगळता येत नाही. तो म्हणजे त्यांचे नातवंडावरचे प्रेम. त्यांची नातवंडे त्यांच्या साठी जणू काही दुधावरची साय होती. त्या चिमुरड्यांशी खेळतांना, गप्पा मारताना त्यांना एक वेगळीच मजा वाटे. तासंतास त्यांच्या

बरोबर आपले आणि त्यांचे मन रमवायचे. तो आनंद त्यांच्या डोळ्यात लगेच दिसायचा. तीनही मुले आपल्या आजोबांना आपला दोस्त मानायची Generation gap जशी काय गायबच झाली होती.

हेच तर त्यांचे खरे कौशल्य होते. लहान असो किंवा वृद्ध, त्यांच्या कलेने घेणे. अशी ही व्यक्ती प्रत्येकाच्या मनात कुठेतरी घर करुन गेली.


असे हे आमचे पप्पा "Allrounder and not out"

**सौ. प्रीती दलाल, अमेरिका**

# निधन

| | | |
|---|---|---|
| नितीन गोविन्द गायतोंडे | (हळगे) | दादर |
| अनंत यशवंत कसबेकर | (कडवाड) | कारवार |
| श्रीकांत नारायण कसबेकर | (कडवाड) | पारले |
| कुंदा दिगंबर कुलकर्णी | (अवर्सा) | पुणे |
| रमेश बाबुराव नाडकर्णी | (मल्लापूर) | मुलुंड |
| सदानंद दत्तात्रय नाडकर्णी | (मल्लापूर) | पुणे |
| अनंत शिवराय नाडकर्णी | (मल्लापूर) | पुणे |
| पांडुरंग (मोहन) सदानंद नाडकर्णी | (अंकोला) | अंधेरी |
| रेखा रामदास फेणे | (चेंडीये) | पणजी |
| स्मिता श्रीनिवास शानभाग<br>(पूर्वाश्रमीच्या स्मिता विनायक कुलकर्णी) | (हळगे) | मुलुंड |
| लताबाई रामकृष्ण रांगणेकर<br>(पूर्वाश्रमीच्या सुशीला रामचंद्र बोरकर) | (कोडीबाग) | पारले |
| नारायण मंगेश तोरगल | (हळियाळ) | माहीम |
| महारुद्र वामन वागळे | (माजाळी) | मुलुंड |
| किशोर दिगंबर वागळे<br>(किशोर वागळे यांनी देहदान केले आहे) | (हाणकोण) | बंगळूर |

# पुण्यस्मरण



श्री. सदानंद शिवराम वागळे
देवाज्ञा : २३/४/१९९५



श्रीमती कमल सदांनद वागळे
देवाज्ञा : १०/६/२०१६

**जगा आईबाबासारखे कोण आहे ।**

**ज्याचे जन्मांतरीचे ऋण आहे ।।**

**असे ऋण हे त्यास व्याज नाही ।**

**त्या ऋण दिन जीवनाचा साज नाही ।।**

**तुमच्यासारखे कौतुक बोल नाहीत ।**

**तुमच्या यातनांना जगी तोड नाही ।।**

**तुमचे नांव जगात आईबाबाएवढे कशालाच मोल नाही ।**

**विजय सदानंद वागळे, ठाणे**
**९२२१६०७५७७**

# प्रथम स्मृतिदिन

**कै. सौ. नीलम शांताराम (अरुण) कुळकर्णी (हळगे) कारवार**
**जन्म २२ -९-१९५३ निधन ३-५-२०२०**



# भावपूर्ण आदरांजली

**दिवस गेले, महिने सरले, वर्ष संपले, कालचक्र सरकले।**

**अचानक आलीस माझ्या जीवनीं, आकस्मिक गेलीस आम्हां सोडूनी।**

**स्मृतीने तुझ्या नयनी येते पाणी, नाहीं तुला विसरणार आम्ही कुणी**

**ओम शान्तीः शान्तीः शान्तीः।**

**शांताराम (अरुण), समीर, सचिन, सौ. स्नेहा, चि. स्नेहिन**
**आणि समस्त कुळकर्णी कुटुंबीय**

# अरविन्द गंडभीर हायस्कूलच्या लोकप्रिय शिक्षिका विदुषी कुंदा कुलकर्णी यांचे देहावसान



जोगेश्वरी येथील अरविन्द गंडभीर हायस्कूलच्या विद्यार्थीप्रिय शिक्षिका सौ. कुंदा दिगंबर कुलकर्णी यांचे १७ फेब्रुवारी रोजी पुणे येथे देहावसान झाले. त्यांची जन्मतारीख १६ जुलै १९३९. त्यांचे शालेय शिक्षण हिंदू हायस्कूलमध्ये झाले होते. विशेष म्हणजे त्यांचे पती श्री. दिगंबर कृष्णराव कुलकर्णी हे सुद्धा त्याच शाळेचे विद्यार्थी. १९४५ साली कराची ते कारवारपर्यंत पसरलेल्या त्या वेळच्या मुंबई इलाख्यातून गुणवत्ता यादीत कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करुन ते ८ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते.

कुंदाबाईनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले व नंतर बी.एड् व एम्. ए.च्या परीक्षा त्या मुंबई विद्यापीठातून उतीर्ण झाल्या. त्यांनी अरविन्द गंडभीर हायस्कूल येथे जवळजवळ पाव शतक इंग्रजी, मराठी व संस्कृत विषयांचे अध्यापन केले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत दोन पुस्तके प्रसिद्ध केली. २१ व्या शतकाच्या सुरुवातीला शालेय स्तरावर आठवी ते दहावीच्या अभ्यासक्रमांत इंग्रजी माध्यमांतून संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर पुस्तक विशेष उपलब्ध नव्हते. तेव्हा त्यांनी आपल्या सहाध्यायी शिक्षिकेसमवेत ‘सुभाषितरत्नमाला’ आंग्ल भाषेण गुंफिता या शीर्षकाचे अडीचशे सुभाषिते असलेल्या पुस्तकाचे नाममात्र किंमतीने प्रकाशन केले. बऱ्याच नियतकालिकांकडून त्यांचे लेख व कथाही प्रसिद्ध झालेल्या आहेत.आकाशवाणीवरील काही कार्यक्रमांतही त्यांनी भाग घेतला होता. त्याशिवाय महात्मा गांधी यांच्या लेखांचे त्यांनी दोन खंडात भाषांतर केले आहे.

कुलकर्णी कुटुंबीयांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यापैकी बऱ्याच जणांचे शिक्षणक्षेत्रांत भरीव योगदान आहे. त्यांचे सासरे श्री. कृष्णराव मंगेश कुलकर्णी यांनी अरविन्द गंडभीर हायस्कूल चालविणाऱ्या जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाहपदाची १६ वर्षे समर्थपणे धुरा वाहिली, त्यांचे पती श्री. दिगंबर कुलकर्णी हे सचिवालयांत उच्च पदावर होते व त्यांना प्रशासनाचा दांडगा अनुभव होता. निवृत्तीनंतर सचिवालयांतील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी त्यांना निमंत्रित करण्यांत येत असे. कुंदाबाईंचे सुपुत्र डॉ. मंगेश कुलकर्णी हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पॉलिटीकल सायन्स या विषयाचे प्राध्यापक व विभाग प्रमुख आहेत.

सौ. कुंदा कुलकर्णी यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### श्री शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही १ लाख ५३ हजार तीन रुपयांची देणगी

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करुन तेथे चांगले नाव कमाविलेले श्री. शरद सलगर यांचे २०१२ साली दुःखद निधन झाले होते. यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ संघाच्या समाज सेवानिधीसाठी, वृध्दसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी देणग्या देतात. यंदाही त्यांनी प्रत्येकी ५१ हजार एक रुपये याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार तीन रुपयांची अशाच प्रकारची देणगी दिली आहे.

### डॉ रमेश तेलंग यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे राहणारे एक कर्ते ज्ञातिबांधव डॉ. रमेश बाबुराव तेलंग यांचे फेब्रुवारी २०२० मध्ये अकस्मात निधन झाले. डॉ. तेलंग संघाचे एक मनस्वी हितचिंतक होते. त्यांचे वडील श्री. बाबूराव तेलंग व आई श्रीमती इंदिरा तेलंग यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी त्यांनी वृद्धसेवानिधीसाठी प्रत्येकी एक लाख एक रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. हीच प्रथा त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती मेधा यांनीही पुढे चालवली आहे. पतीच्या पहिल्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांनी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवा निधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे.

डॉ. तेलंग यांची कन्या सौ. प्रीती दलाल यांनी वडिलाविषयी लिहिलेला एक हृद्य लेख याच अंकात अन्यत्र छापला आहे.

### श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीनिवास नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

ग्रँट रोड जवळील मॉडेल हाऊसमध्ये पूर्वी राहणारे श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीनिवास नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ एका हितचिंतकाने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर समाजसेवा निधीस एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती सुंदर पांडुरंग वाघ यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वृद्ध सेवा निधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी

गेल्या पिढीत माहीम येथे राहणारे श्री. पांडुरंग विनायक वाघ हे नरहरी म्हणून सर्वांना परिचित होते. सध्याच्या मुखपत्रिकेचे वडील भावंड म्हणजे संघातर्फे ८० वर्षापूर्वी प्रसिद्ध होणारे 'शारदा' या त्रैमासिकाच्या संपादक मंडळावर ते १९३८-४० च्या दरम्यान कार्यरत होते व ते कोंकणी विभाग सांभाळत १९३५ साली 'वोंवळा' हा केवळ कोंकणी लेखांचा संग्रह प्रकाशित झाला होता त्यांत 'गरीबालो संसार' हा त्यांचा लेख 'नरहरी' या नावांने प्रसिद्ध झाला होता.

**श्री शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही १ लाख ५३ हजार तीन रुपयांची देणगी**

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करुन तेथे चांगले नाव कमाविलेले श्री. शरद सलगर यांचे २०१२ साली दु:खद निधन झाले होते. यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ संघाच्या समाज सेवानिधीसाठी, वृध्दसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी देणग्या देतात. यंदाही त्यांनी प्रत्येकी ५१ हजार एक रुपये याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार तीन रुपयांची अशाच प्रकारची देणगी दिली आहे.

**डॉ रमेश तेलंग यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी**

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे राहणारे एक कर्ते ज्ञातिबांधव डॉ. रमेश बाबुराव तेलंग यांचे फेब्रुवारी २०२० मध्ये अकस्मात निधन झाले. डॉ. तेलंग संघाचे एक मनस्वी हितचिंतक होते. त्यांचे वडील श्री. बाबूराव तेलंग व आई श्रीमती इंदिरा तेलंग यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी त्यांनी वृद्धसेवानिधीसाठी प्रत्येकी एक लाख एक रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. हीच प्रथा त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती मेधा यांनीही पुढे चालवली आहे. पतीच्या पहिल्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांनी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवा निधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे.

डॉ. तेलंग यांची कन्या सौ. प्रीती दलाल यांनी वडिलाविषयी लिहिलेला एक हृद्य लेख याच अंकात अन्यत्र छापला आहे.

**श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीनिवास नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी**

ग्रँट रोड जवळील मॉडेल हाऊसमध्ये पूर्वी राहणारे श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीनिवास नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ एका हितचिंतकाने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर समाजसेवा निधीस एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती सुंदर पांडुरंग वाघ यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वृद्ध सेवा निधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी**

गेल्या पिढीत माहीम येथे राहणारे श्री. पांडुरंग विनायक वाघ हे नरहरी म्हणून सर्वांना परिचित होते. सध्याच्या मुखपत्रिकेचे वडील भावंड म्हणजे संघातर्फे ८० वर्षापूर्वी प्रसिद्ध होणारे 'शारदा' या त्रैमासिकाच्या संपादक मंडळावर ते १९३८–४० च्या दरम्यान कार्यरत होते व ते कोंकणी विभाग सांभाळत १९३५ साली 'वोंवळा' हा केवळ कोंकणी लेखांचा संग्रह प्रकाशित झाला होता त्यांत 'गरीबालो संसार' हा त्यांचा लेख 'नरहरी' या नावांने प्रसिद्ध झाला होता.

श्री. वाघ यांच्या पत्नी श्रीमती सुंदर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्याप्रसंगी त्यांच्या कन्या सौ. नीला दिलीप मुझुमदार व कुटुंबीय व पुत्र प्रथितयश ई. एन्. टी तज्ज्ञ डॉ. सुहास वाघ व कुटुंबीय यांनी वृद्धसेवानिधीसाठी प्रत्येकी एक लाख याप्रमाणे एकूण दोन लाख रुपयांची देणगी दिली

आहे.

**डॉ. गजानन शिवराय नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्याच इच्छेनुसार एज्युकेशन सोसायटीसाठी सुद्धा ५०,१०१ रुपयांची देणगी**

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात अंधेरी येथे राहणारे डॉ. गजानन शिवराय नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ समाजसेवा निधीसाठी ५०,१०१ रुपयांची देणगी दिली होती. यासंबंधी मजकूर होता. त्यांच्या पत्नी श्रीमती मंगला यांनी त्यावेळी एज्युकेशन सोसायटीला सुद्धा ५०,१०१ रुपयांची देणगी दिली होती पण अनवधानाने त्यांचा उल्लेख करायचा राहिला ते नमूद करण्याचा हा प्रपंच.

**श्रीमती उषा (वर्षा) उल्हास शानभाग यांच्यातर्फे समाजसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देगणी**

श्री. उल्हास शानभाग यांचे बेळगांव येथे उदयभुवन या नांवाचे हॉटेल आहे. त्यांच्या पत्नी म्हणजे सौ. उषा (वर्षा). त्या कारवार येथील श्रीमती शुभदा व श्री. यशवंत (बबन) नीलकंठ रेगे यांची कन्या. सौ. उषाने अलीकडेच आईवडिलांच्या स्मरणार्थ समाजसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती सुशांता (पुष्पा) व श्री. शिवानंद तेलंग यांच्यातर्फे समाजसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देगणी**

श्रीमती उमाबाई (रमा) व श्री. शंकर (बापू) आनंदराव तेलंग हे पूर्वी बाबुलनाथ येथे राहायचे. त्यांचे पुत्र श्री. शिवानंद (नंदू) यांचे कुटुंबीय सध्या दादर येथे स्थायिक झाले आहेत. अलीकडेच त्यांना ७५ वर्षे पूर्ण झाली व विवाहाला ५० वर्षे झाली. त्यानिमित्त श्रीमती सुशांता (पुष्पा) व श्री. शिवानंद यांनी आई वडिलांच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी**

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी ज्ञातीच्या संदर्भातील विषयांत विशेष रस घेत असत. त्यांनी व त्यांच्या आप्तेष्टांनी अनेकवेळा भरघोस देणग्या दिल्या आहेत. दोन वर्षापूर्वी कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचा नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून अरुंधती व पणती कु रिया यांनी वृद्धसेवानिधीसाठी

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| २. | श्री. कमलाकर यशवंत तेलंग यांच्या ३ ऱ्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती सुरेखा (सुमन) यांजकडून. | ५,००० |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्रीमती शुभदा व श्री. यशवंत नीलकंठ रेगे यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती उषा (वर्षा) उल्हास शानभाग यांजकडून. | ५०,००० |
| ४. | श्रीमती सुशीला व श्री देवीदास शांताराम कसबेकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती आशा दरनुले यांजकडून. | ३०,००० |
| ५. | श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. नारायण श्रीनिवास नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून. | १,००,००० |
| ६. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५०,००१ |
| ७. | अनामिकाकडून | |
| | खालील व्यक्तींच्या वाढदिवसाप्रसंगी | |
| | श्री. सदानंद गणपत नाडकर्णी | १०,००१ |
| | डॉ. नलिनी महारुद्र नाडकर्णी | १,००१ |
| | श्रीमती शालिनी मनोहर नाडकर्णी | १,००१ |
| | खालील जोडप्यांच्या विवाहाच्या वाढदिवसाप्रसंगी | |
| | श्रीमती इंदू व श्री. सदानंद गणपत नाडकर्णी | १,००१ |
| | श्रीमती सुमित्रा व श्री. जयवंत यशवंत नाडकर्णी | १,००१ |
| | श्रीमती सिंधू व श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी | १,००१ |
| | खालील व्यक्तींच्या स्मृतीप्रीत्यर्थ | |
| | श्रीमती सुशीला देवीदास कसबेकर | १,००१ |
| | डॉ. स्मिता विजय परुळेकर (पूर्वाश्रमीच्या उषा गणपत नाडकर्णी) | १,००१ |
| ८. | श्रीमती वृंदा व श्री. श्रीकान्त बाळकृष्ण पालेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कन्या सौ. नयना अशोक कुलकर्णी यांजकडून. | ५०,००० |
| ९. | श्रीमती उमाबाई (रमा) व श्री. शंकर (बापू) आनंदराव तेलंग यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. शिवानंद यांच्या ७५ व्या वाढदिवसाप्रसंगी स्नुषा श्रीमती सुशांता (पुष्पा) व पुत्र श्री. शिवानंद (नंदू) यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त उभयतांकडून | ५०,००० |
| १०. | श्रीमती ज्योती (रेखा) दीपक वागळे यांजकडून | |
| | काका श्री. प्रभाकर नागेश नाडकर्णी यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी. | ११,००० |
| | आई श्रीमती वत्सला विश्वनाथ नाडकर्णी यांच्या ९१ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ. | ५१,००० |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| २. | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून श्रीमती अरुंधती व पणती कु. रिया यांजकडून | ५०,००० |

| | | |
|---|---|---|
| ३. | डॉ. रमेश बाबुराव तेलंग यांच्या १ ल्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती मेधा यांजकडून. | १,००,००१ |
| ४. | श्रीमती सुंदर पांडुरंग वाघ यांच्या जन्मशताब्दी निमित्त | |
| | कन्या श्रीमती नीला दिलीप मुझुमदार व कुटुंबीयातर्फे. | १,००,००० |
| | पुत्र डॉ. सुहास पांडुरंग वाघ व कुटुंबीयांकडून | १,००,००० |
| ५. | सविता सबनीस फाउंडेशन कडून<br>१. श्री. वासुदेव गजानन सबनीस,<br>२. श्रीमती स्नेहलता (चंपू) वासुदेव सबनीस,<br>३. श्रीमती सविता किशोर सबनीस<br>४. श्रीमती शुभांगी व श्री. अच्युत काशिनाथ वाघ<br>५. श्रीमती माया व श्री पांडुरंग काशिनाथ वाघ<br>यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी ५००१ | २५,००५ |
| ६. | श्रीमती रीमा पालेकर व श्री. श्रवण शेट्टी यांच्या विवाह प्रसंगी आई श्रीमती निशा व वडील श्री. केदार सुरेंद्र पालेकर यांजकडून. | ११,१११ |
| ७. | श्री. माधव रामदास नायक यांच्या स्मरणार्थ त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी कन्या श्रीमती मेघना देसाई कडून. | १,५०० |
| ८. | श्रीमती मंजुळा शांताराम गायतोंडे यांच्या स्मरणार्थ नात श्रीमती शुभदा सुभाष कुलकर्णी यांजकडून. | १५,००० |
| ९. | श्रीमती हीरा महारुद्र देसाई यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ बंधू श्री. अशोक विनायक आरस यांजकडून. | ५०,००० |
| १०. | श्रीमती कुंदा पांडुरंग कसबेकर यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. तुषार यांजकडून. | १०,००० |
| ११. | श्रीमती विमल आणि श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या पुण्यतिथी प्रसंगी पुत्र सर्वश्री सीताराम व दीपक यांजकडून. | १०,००० |
| १२. | श्रीमती पूजा (माया) शरद गोठीवरेकर व श्री. उल्हास कृपाकर वागळे यांच्या स्मरणार्थ बहीण श्रीमती कल्पना चिंतामण आकेरकर यांजकडून. | १०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती आशा दरनुले यांच्याकडून विवाहाच्या सुवर्ण महोत्सवी प्रसंगी | २०,००० |
| २. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून. | ५१,००१ |
| ३. | डॉ. गजानन शिवराय नाडकर्णी यांच्या इच्छेनुसार त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मंगला यांजकडून. | ५०,१०१ |

(ऊर्वरीत देणग्यांचा तपशील जागेअभावी पुढील अंकी)

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.